# INTERDISCIPLINARY INTERNATIONAL SEMINAR

# Agriculture and Rural Development:

# Spatial Issues, Challenges and Approaches

**15th December, 2018**

## Organizer

**Department of Geography,**

**Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur**

## EDITORS

**Principal Dr. R. K. Shanediwan**

**Dr. D. L. Kashid-Patil**

**Dr. Mrs. N. D. Kashid-Patil**

Scanned with CamScanner

**Editor**

Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya,
Dasara Chowk, Kolhapur (MS)

**ISSN : 2349-638x Aayushi International Interdisciplinary Research Journal (online)** Peer Reviewed and Indexed Journal IMPACT FACTOR 4.574

**Dr. D. L. Kashid-Patil,**

No part of this proceeding book shall be copied, reproduced or transmitted in any form or any means, such as Printed material, CD – DVD / Audio / Video Cassettes or Electronic / Mechanical, induding photo, copying, recording or by any information storage and retrieval system, at any portal, website etc; Without prior permission.

## Disclaimer

Research papers published in this Seminar book are the intellectual contribution done by the authors. Authors are solely responsible for their published work in this special Issue and the organizers of this Seminar are not responsible in any form.

**Editors**

1. **Principal Dr. R. K. Shanediwan**
2. **Dr. D. L. Kashid-Patil**
3. **Dr. Mrs. N. D. Kashid-Patil**

**Editorial Board**

**Mr. R. M. Kamble**
**Dr. Arjun Wagh**
**Shri. S. V. Chougule**
**Dr. Mrs. S. V. Gaikwad**
**Dr. D. G. Gatade**
**Dr. N.S. Jadhav**
**Dr. A. R. Chougule**
**Shri. S. P. Zitre**

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 41. | Shri Sanjay Salokhe<br>&<br>Dr. A. S. Patil | Development of Road Network in Kolhapur District | 207 To 212 |
| 42. | Dr. Vasanth R. Ramade | Spatial Pattern Of Urban Gender Disparity In Literacy Rate In Kolhapur District | 213 To 215 |
| 43. | Mr. M. D. Kadam<br>&<br>Dr. S. D. Shinde | Land Use Pattern In Urn River Basin, Maharashtra: A Geographical Study | 216 To 220 |
| 44. | Pralhad N. Kamble<br>&<br>Nilesh M. Wankhade | Progress of Irrigation System in Maharashtra State | 221 To 228 |
| 45. | Dr. Balasaheb Vithoba Mali | Role Of Agro Tourism In Rural Development With Reference To Maharashtra | 229 To 231 |
| 46. | Dr. Sarjerao Pandurang Chavan | Agriculture and Rural Development Scenario: Sustainable Agriculture | 232 To 233 |
| 47. | Dr. Ravindra A. Kulkarni | Agro Cultural Concerns in Sadanand Deshmukh's Novels | 234 To 236 |
| 48. | Shivraj Bhagwanrao Aundhekar | Tools of financial inclusion: a case study of BC model of Bhagyalaxmi Mahila Sahakari bank Nanded | 237 To 239 |
| 49. | डॉ. आर. के. शानेदिवाण | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतरावजी चव्हाण यांचे शेतीविषयक विचार | 240 To 244 |
| 50. | प्रा. दीपककुमार बळवी | आदिवासींच्या साहित्यातील भूमिहीन ग्रामीण समस्या आणि उपाय | 245 To 248 |
| 51. | डॉ. राहुल दत्ता पांढरीकर | महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ आणि ग्रामीण विकास | 249 To 251 |
| 52. | श्री अजितकुमार भिमराव पाटील | कसबा बावडा शेती परिसरातील जमीनीवर अशुद्ध पाण्याचा होणाऱ्या परिणामाचा अभ्यास | 252 To 256 |
| 53. | डॉ. विजय जालिंदर देठे | महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासातील सहकार चळवळीचे यशापयश | 257 To 260 |
| 54. | प्रा.गणेश मोतीराम कापसे<br>व<br>डॉ.दिगाबर आ. पारधी | भंडारा जिल्ह्यातील जलसिंचन व कृषी पीक प्रारुपात झालेला बदल | 261 To 264 |
| 55. | प्रा. कलंदर मुस्तफा पठाण | कृषी पर्यटन हे कृषी क्षेत्राला मिळालेले वरदान | 265 To 268 |
| 56. | प्रा. संतोष हंबीर कांबळे | श्री महादेव सह. दुध व्यावसायिक व कृषीपूरक सेवा संस्थेचा शिये परिसरातील दुध उत्पादकांच्या आर्थिक विकासातील सहभाग - एक अभ्यास | 269 To 271 |
| 57. | प्रा.हणमंत एस. सावंत | पर्यटन – ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम | 272 To 275 |
| 58. | डॉ.संजय सागरु सपकाळ | सांगली जिल्ह्याच्या ग्रामीण विकासात उपसा जलसिंचन योजनांचे योगदान | 276 To 279 |
| 59. | प्रा. डॉ. संजय भाऊराव गिरे | कृषी आणि ग्रामीण विकासाचे धोरण | 280 To 282 |
| 60. | डॉ.पांडुरंग बाळकृष्ण पाटील | सार्वजनिक, शैक्षणिक व कृषि ग्रंथालयांचे कृषि, ग्रामीण आणि शैक्षणिक विकासातील योगदान | 283 To 286 |




Scanned with CamScanner

# कृषी पर्यटन हे कृषी क्षेत्राला मिळालेले वरदान

प्रा. कलंदर मुस्तफा पठाण
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर गढी
ता. गेवराई जि. बीड 431122

**प्रस्तावना :**

देशाचा आत्मा म्हणजे कृषी किंवा शेती होय. कारण एकूण लोकसंख्या 60 ते 70 टक्के जनतेची नाळ या क्षेत्राशी जोडली गेलेली आहे. वेगवेगळ्या स्वरूपात लोक कृषी क्षेत्राशी संबंधित आहेत. परंतु आज या शेती व्यवसायाला नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक समस्यांनी घेरलेले आहे. त्यामुळे हा व्यवसाय आज तोट्यात चालला आहे. हा तोटा सहन न झाल्यामुळे अनेक शेतकरी आत्महत्या करत आहेत. जर असेच चालत राहिले तर या क्षेत्राकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टीकोन बदलेल व अर्थव्यवस्थेला व प्रशासन व्यवस्थेला याचा फार मोठा फटका बसेल. अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल.

त्यासाठी कृषी क्षेत्रामध्ये नवीन नवीन संकल्पना उदयास येत आहे. त्यातच व्यापारी शेतीला महत्त्व आहे. त्यातूनच कृषी पर्यटन ही एक नवीन संकल्पना उदयास आलेली आहे. त्यामुळे ही संकल्पना कृषी क्षेत्रासाठी एक नवीन वरदान ठरणार आहे. शेती करणाऱ्या शेतकऱ्यासाठी शेतीमध्ये काहीतरी नवीन करून आपला विकास साधण्याची नवीन दिशा आज मिळालेली आहे. शेतकऱ्यांना एक व्यवसाय म्हणून याकडे बघावे लागेल व त्यात नवीन नवीन संशोधन करून नवीन कल्पना अस्तित्वात आणाव्या लागतील. ज्यामुळे पर्यटकांचे लक्ष केंद्रीत होईल.

**कृषी पर्यटन संकल्पना :**

कृषी पर्यटन ही एक आधुनिक संकल्पना आहे. याची सुरवात सर्वात प्रथम आस्ट्रेलिया या देशात 65 वर्षापूर्वी झाली व महाराष्ट्रात सर्वात प्रथम बारामती या ठिकाणी झालेला आहे. बारामती येथे कृषी तज्ञ स्व. अण्णासाहेब पवार यांनी शेतीमध्ये नाविण्यपूर्ण प्रयोग केले. प्रथमतः त्यांनी कृषी संशोधन पाहण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांची राहण्याची व भोजनाची सोय मोफत केली. कालांतराने हा लोंढा वाढत गेला. त्यामुळे शुल्क अकारून कृषी अभ्यास दौरे आयोजित केले. अशा तऱ्हेने महाराष्ट्रात कृषी पर्यटन संकल्पनेचे बीज रोवले गेले. आज महाराष्ट्रात या चळवळीला मोठा सहभाग लाभला आहे. 16 मे हा जागतिक कृषी पर्यटन दिन म्हणून साजरा करण्यात येतो. कृषी पर्यटन केंद्राना शहरी पर्यटकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. शहरीकरणामुळे दिवसेंदिवस निसर्गाकडे ओढा वाढत आहे.

कृषी पर्यटन म्हणजे शेतावरील फेरफटका होय. ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देणे. शहरी जीवनाचा कंटाळा आल्यानंतर थोडी फार मौजे मस्ती करण्यासाठी निर्सगाच्या सानिध्यात शेतकऱ्यांच्या शेतात जावून रहावे व शेतकऱ्यांनी त्यांच्या घरच्या पाहूण्याप्रमाणे पाहुणचार करणे म्हणजे कृषी पर्यटन होय. कृषी पर्यटन ही पर्यटनाची नवीन संकल्पना आहे. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास, ग्रामीण विकासातून महाराष्ट्राचा विकास या ब्रीद वाक्याला साजेल असे कृषी पर्यटन. कृषी व्यवसायाला या जोडधंद्याची जोड देवून उत्पादनात व उत्पन्नात भर घालता येणारी संकल्पना म्हणजे कृषी पर्यटन होय.

आजच्या धावपळीच्या जीवनामध्ये शहरी जनतेची ग्रामीण भागाशी नाळ तुटलेली आहे. तसे शहरी भागातील मूलांना बंदिस्त शाळेतील जीवन जगावे लागते. गर्दीचे रस्ते गोंगाट हॉटेलचे जेवण टी.व्ही. कंपुटर इंटरनेट इत्यादी सर्व घटक मर्यादित आहेत. त्यामुळे यांच्या मनातील अस्वस्थपणा वाढत चालला आहे. त्यामुळे चीडचीडपण, कोणत्याही गोष्टीत मन लागने, उतावीळपणा या साऱ्यापासून दूर निवांत निसर्गाच्या सानिध्यात कोठेतरी जावे ज्याठिकाणी चुलीवरील जेवण, शेतात अनवानी पायांनी हींडने पाण्यात डुंबने शेतातील ताजी फळे खाने भाजीपाला तोडने ग्रामीण खेळ खेळने नैसर्गिक हवेत झोपने बागडने या व यासारख्या अनेक सेवा सुविधांचा उपभोग घेणे. त्यात बैलगाडीत बसून चक्कर मारने घोडेसवारी करणे, मासेमारी करणे वेगवेगळ्या पाळीव प्राण्यासोबत खेळणे बागडने. या गोष्टी करण्यासाठी ग्रामीण भागात जावून रहावे व मनातील अस्वस्थपणा संपवून नवीन उमेदीने कामाला लागने या संकल्पनेतून कृषी पर्यटनाला उदय झालेला आहे.



Scanned with CamScanner

**संशोधन विधान :** कृषी पर्यटन हे कृषी क्षेत्राला मिळालेले वरदान.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1) कृषी पर्यटनाचा अभ्यास करणे.
2) कृषी पर्यटनाचा व्यवसायिक स्वरूप कसे आहे ते अभ्यासणे.
3) या व्यवसायातून झालेल्या बदलाचा अभ्यास करणे

**संशोधनाची गृहीतके :**

1) कृषी क्षेत्रामध्ये नवीन जोडधंदा म्हणून कृषी पर्यटनावचा उगम.
2) ग्रामीण विकासाला चालना देणारी संकल्पना आहे.

**कृषी पर्यटन व्याप्ती :**

शहरी लोकांना ग्रामीण जीवन पध्दतीची माहिती होण्यासाठी कृषी पर्यटन हे महत्त्वाचे साधन आहे. ग्रामीण भागातील त्यांचे राहणीमान त्याचे अचार त्यांचे विचार परंपरा सण उत्सव सांस्कृतिक कार्यक्रम आपसातील वागणूक त्यांची शहरी भागातील लोकाविषयी असणारे आकर्षण इत्यादी बाबीचा अभ्यास करण्यासाठी कृषी पर्यटन उपयोगी पडते. तसेच ग्रामीण भागातील लोकांचे अन्न, अन्न बनवऱ्याची पध्दती शहरी व ग्रामीण जीवनातील तफावत आर्युवेदीक औषधे ग्रामीण लोकांची असणारी रोग प्रतिकारक शक्ती, पैसा, संपत्ती खर्च करण्याची पध्दती, ग्रामीण निसर्ग देव देवता, प्राणी, पक्षी, पीके यांची ओळख होते. तसेच ग्रामीण भागातील घरे त्यांची झोपण्याची पध्दती इतर बाबी तसेच ग्रामीण भागातील लोक शहरी भागातील लोकांना हस्तकला व कलाकुसरीच्या वस्तू इत्यादी खरेदी करुन याचा आनंद मिळतो.शहरी भागातील लोकांकडे पैसा असतो. परंतु आनंद मिळत नाही तर ग्रामीण जनतेकडे अनंत असतो. तर पैसा नाही अशी परिस्थिती असते. याची देवाण–घेवाण करत ते आपले जीवन सुकर करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे कृषी पर्यटन ही एक सांस्कृतिक देवाण–घेवाण करण्याचे एक चांगले साधन बनत आहे.

**कृषी पर्यटन व्याख्या :**

कृषी पर्यटनाच्या व्याख्या वेगवेगळया विचारवंतांनी व संशोधकांनी वेगवेगळ्या केलेल्या आहेत.
शब्दकोषात कृषी पर्यटनाचा अर्थ ग्रामीण भागात जावून व तेथे राहून तेथील अनुभव घेणे होय.

**बारबेरी व मर्शेगा :**

कृषी क्षेत्रामध्ये कोणतीही कृती विकसीत करणे ज्यामुळे शेताकडे पर्यटकांचे आकर्षण वाढेल त्याला कृषी पर्यटन असे म्हणतात.

कृषी पर्यटनाची साधी सोपी व सरळ व्याख्या करावयाची झाल्यास शेतकऱ्याच्या शेतात पर्यटकांसाठी निवास व जेवणाची उत्तम व्यवस्था करून देणे होय.


भारतामध्ये कृषी पर्यटन सुरू करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे. 2005 साली प्रथम अॅग्रो टूरीझम डेव्हलपमेंट कार्पोरेशनची स्थापना पुणे शहरापासून 70 कि.मी. अंतरावर असणाऱ्या पालशिलवाडी ता. बारामती जि. पुणे येथे 28 एकराच्या क्षेत्रात स्थापन झाली. हा पथदर्शी प्रकल्प होता. यानंतर महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन सरकारी महासंघ मर्यादित ;ड त्व्द्ध मार्ट या संस्थेची स्थापना करण्यात आली.

**कृषी पर्यटन केंद्राची स्थान निश्चिती :**

कृषी पर्यटन केंद्राला चालना देण्यासाठी व केंद्राचा विकास होण्यासाठी कृषी पर्यटन केंद्राचे स्थान हे महत्त्वाचे घटक आहे. कारण शहरी भागातील लोक या केंद्राकडे अकर्षित होतील त्यामुळे ग्रामीण भाग निवडतांना खालील आकृतीप्रमाणे स्थान निश्चित करावे.



Scanned with CamScanner




**कृषी पर्यटन केंद्राचे फायदे :**

कृषी पर्यटन केंद्रामुळे ग्रामीण भागात नवचैतन्य निर्माण झाले आहे व नवीन रोजगाराची संधी उपलब्ध झालेली आहे.

1) ग्रामीण व शेतकरी कुटुंबासाठी नवीन रोजगार संधी उपलब्ध होत आहे.
2) शेतकऱ्याला कृषी पर्यटन केंद्रामुळे अधिकचे उत्पन्न मिळते. त्यामुळे त्याचे जीवनमान व राहणीमान उंचावण्यास मदत होते.
3) सामाजिक व सांस्कृतिक वारसा जोपासल्यामुळे ग्रामीण भागातून शहरी भागात संस्कृतीची देवाण–घेवाण होण्यास मदत होते.
4) ग्रामीण शेतकऱ्याचा शहरी भागातील लोकांशी संपर्क वाढल्यामुळे विचार आचार आणि चांगुलपणा इत्यादी गोष्टीमध्ये सुधारणा होते.
5) शहरी लोकांना ग्रामीण भागातील जीवन कसे असते शेती कशी केली जाते यासंबंधी त्यांना माहिती मिळते व त्यांच्या मनातील अनेक प्रश्नांची सोडवणूक होते.
6) शहरी जनतेत ग्रामीण लोकांविषयी अपुलकी निर्माण होते.
7) ग्रामीण विकासाला चालना मिळण्यासाठी व कृषी क्षेत्रात शेतीपूरक एक नवा उद्योग विकास पाहण्यासाठी कृषी पर्यटन उद्योग हे वरदान ठरले आहे.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्रामध्ये कृषी पर्यटन केंद्राचा विकास झाला असला तरी नैसर्गिक संकटे व परिस्थिती यांचा संगम करून हा विकास झालेला आहे. यात वेगवेगळ्या पिकांखालील क्षेत्र वेगवेगळ्या भागात वेगवेगळी सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती सण, समारंभ याचा देखील परिणाम झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये 45 टक्के लोक हे शहरी भागात कायम वास्तव्यास आहेत. त्यांना ग्रामीण जीवनाची ओढ निर्माण करण्याची गरज आहे. यातून कृषी पर्यटन व्यवसाय हा चांगल्याप्रकारे विकास होवू शकतो. परंतु काही अडचणी या उद्योगासमोर आहेत. सर्व प्रथम ग्रामीण लोकांमध्ये याविषयी मोठ्या प्रमाणात अज्ञान आहे. तसेच शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती, एकदम हालाकीची आहे. त्यामुळे कृषी पर्यटन केंद्रात पर्यटकांना सेवा व सुविधा पुरवण्यास अडचणी निर्माण होतात. तसेच या व अनेक अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते. त्याचा परिणाम कृषी पर्यटनावर झालेला आहे. तसेच पर्यटकांच्या सुरक्षीततेचा प्रश्न देखील निर्माण होतो.

**उपाय योजना :** कृषी क्षेत्रामध्ये एक नवी संकल्पना व नवीन व्यवसाय म्हणून याची निवड करण्यासाठी वेगवेगळ्या संस्थेतर्फे तसेच स्थानिक कृषी कार्यालये सामाजिक संस्था विद्यापीठे, शाळा, सरकारी कार्यालये इत्यादी मार्फत



Scanned with CamScanner

ग्रामीण भागात राहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा शिबीरे अभ्यासक्रम घेवून कृषी पर्यटनाला चालना देण्याचे काम केले पाहिजे तसेच कृषी पर्यटनात लागणाऱ्या सेवा सुविधा देण्यासाठी शासनाने आर्थिकसाहय सेवा सुविधा पुरविण्यात आल्या पाहिजेत. कृषी पर्यटन केंद्र चालकांना व पर्यटकांना शासनाने संरक्षण पुरवण्यात आले पाहिजे. तसेच 16 मे हा जागतिक कृषी पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो. तो पूर्ण उत्साहाने व ग्रामीण जनतेपर्यंत याची माहिती सामाजिक व शासकीय स्तरावरुन देण्यासाठी कार्य केले पाहिजे.

आज कृषी पर्यटन विकास पावत असले तरी शासनाच्या यंत्रणेचा याला हातभार लागला तर सोन्याचे दिवस कृषी पर्यटन क्षेत्राला आल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ :**

1) कृषीशास्त्र परिभाषीक (मराठी–इंग्रजी) प्रकाराक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.
2) डॉ. रामचंद्र निवृत्ती साबळे, ष्कृषी घटकष् अमोल प्रकाशन, पुणे.
3) डॉ. जयंत पाटील, कृषी साधक, राजहंस प्रकाशन, पुणे.
4) माजीद हुसेन, कृषी भूगोल, रावत पब्लिकेशन जयपूर व नई दिल्ली.
5) डॉ. विठ्ठल घारपुरे, कृषी भूगोल, पिंपळापूरे ॲण्ड क. पब्लिशर्स, नागपूर.
6) पर्यटन धोरण महाराष्ट्र 2006.
7) महाराष्ट्र कृषी पर्यटन विस्तार योजना 2008, ATDC, Pune.

Scanned with CamScanner